दैनिक दिव्य मराठी
# दिव्य सिटी
अहमदनगर. बुधवार, ९ मार्च २०२२ | फाल्गुन शु. ६, शके १९४३

# लिज्जत पापड संस्थेचे सुरेश कोते सुर्यदत्त नॅशनल अवार्डने सन्मानित




कर्नाटक राज्याचे राज्यपाल घावरचंद गेहलोत यांच्या हस्ते सोशल फाऊंडेशन, पुणे, महाराष्ट्र संस्थेचा 'कर्तव्यम् प्रेरणा २०२२' राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करताना.

प्रतिनिधी | अकोले

कोतूळ येथील भूमिपुत्र तथा पुण्यातील श्रीलक्ष्मी सहकारी बँकेचे अध्यक्ष व महिला गृह उद्योग लिज्जत पापड संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश कोते यांना २०२२ चा सुर्यदत्त नॅशनल अवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले. पुणे येथील नामांकित ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट यांचे वतीने हा पुरस्कार पुणे येथे खास समारंभात कर्नाटकचे राज्यपाल घावरचंद गेहलोत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते कोते यांचा या वर्षीचा कर्तव्यम् प्रेरणा हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यानंतर लगेचच त्यांना कर्नाटकचे राज्यपाल घावरचंद गेहलोत यांच्या हस्ते ७ मार्चला सुर्यदत्त नॅशनल अवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले. कोते हे अहमदनगर जिल्ह्यातील कोतूळ (ता. अकोले) येथील मुळ रहिवासी असून ते पुण्यात वास्तव्यास आहेत. दानशूर, कर्तुत्ववान व्यक्तिमत्त्व म्हणून शुन्यातून विश्व निर्माण केलेले कोते सर्वदूर परिचित आहेत. यासह त्यांचा साधेपणा शांत, मितभाषी व प्रेमळ व्यक्तिमत्व आणि मदतीला धावून जाण्याच्या सातत्यपूर्ण स्वभावामुळे आजपर्यंत ते अनेक पुरस्कारांनी सन्मानीत झाले आहेत.